# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 21/12/2021 (मंगळवार)

---

### चोरी

1) पो.स्टे. पारशिवनी :— अंतर्गत येथे दिनांक 20/12/2021 चे 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— विलास रामभाउ सिंगोरे, वय 53 वर्ष, रा. सितलवाडी जि.प.उ.प्रा.शाळा सतरापुर येथे (मुख्याधापक) आहेत. जि.प.उ.प्रा.शाळा सतरापुर येथे पहील्या मजल्यावर लावलेली ट्रियोन कंपनीची 32 इंच टि.व्ही. कि. 20,000/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि.नागुलवार मो. क्र. 9923372647 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 5 कि.मी. अंतावरील चनकापुरा कॉलनी येथे दिनांक 20/11/2021 चे 04.15 वा. ते 04.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ.लक्ष्मी ओमप्रकाश उमर वय 35 वर्ष, रा.क्वार्टर नं 122/04 चनकापुर हिचे पती डयुटीवर गेले असता तिने तिचे राहते क्वार्टर चे दार टेकवुन समोरील रूम मध्ये झोपुन होती. त्यादरम्यान एक अज्ञात इसम हा तिचे घरातुन निघतांना दिसला. म्हणुन तिने त्यास पकडण्या करीता गेली असता, तो अज्ञात इसम फिर्यादीस धक्का मारून पळुन गेला. त्यानंतर फिर्यादीने तिच्या मुलाचे फ्रिज वरती ठेवुन असलेला पर्स पाहण्यास गेली असता तो दिसुन न आल्याने व तिच्या मुलांने त्या पर्स मध्ये मोठया मोठया मुलाला देण्याकीरता ठेवुन असलेले कि. 7,000/— रू. नगदी त्या अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो नं. 9673837007 हे करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :— अंतर्गत 8 कि.मी. अंतावरील गोन्ही तस. काटोल येथे फिर्यादी नामे— ज्ञानेश्वर रामकिसन मोरोलिया, वय 45 वर्ष रा. गोन्ही काटोल ता. काटोल याने आपले शेतातील गोठयात एक बैल जोडी व चार गाय बांधुन दिनांक 19/12/2021 रोजी सांयकाळी 19.00 वा. परत आले व दिनांक 20/12/2021 रोजी सकाळी 06.00 वा. शेतात गेले असता शेतातील गोठयातील एक बैल जोडी किंमती 25,000/—रूपये तसेच दोन गाय किमती 25,000/—रूपये असे एकुण 50,000/—रूपयाचे जवानरे हे गोठयाचे दरवाज्याचे अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश करून रात्री दरम्यान चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 380, 461 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार श्रीनिवास वाघ मो.क्र. 9823348374 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील बेला ते पुर्ती साखर कारखाना येथे दिनांक 20/12/2021 चे 10.30 वा. दरम्यान एमएच– 40/बीई– 7831 क्रमांकाचा ट्रॅक्टरचा चालक आरोपी क्र. 1. रोशन विनायक सराटे वय 28 वर्षे रा. सालईरानी व 2) विलास गजानन मुळे, वय 40 वर्ष, रा. बेला यांनी संगनमत करून त्यांच्या ताब्यातील वाहनात अवैद्यरित्या विना पावाना गौण खनीज रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन जुना ट्रॅक्टर क्र. एम.एच 40/बी.इ– 7831 व विना क्रमांकाची ट्रॉलीसह कि. 1,00000/–रू., गौण खनीज रेती एक ब्रास किं 1,000/–रू. व निळया रंगाचा विओ कंपनीचा मोबाईल कि. 5,000/–रू. असा एकुण कि. 10,6000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे सतेन्द्र रंगारी पो.स्टे. बेला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री पंकज वाघोडे मो.क्र. 7304210724 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मौजा पालासावळी येथे दिनांक 20/12/2021 चे 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामकृष्ण मारोती ठाकुर वय 48 वर्ष, रा. पालासावळी व आरोपी नामे– प्रमोद ठाकुर रा. पालासावळी हे ऐकमेकाचे चुलतभाउ असुन घराशेजारी राहतात. आरोपी हा आपल्या मुलाबाळाला व पत्नीला शिवीगाळ करीत होता. फिर्यादीने आरोपीला शिवीगाळ का करतो असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीला कोणत्यातरी लोखंडी वस्तुने उजव्या हाताचा पंजावर मारुन जखमी केले व शिवीगाळ मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार वरखडे मो.नं 9763215465 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 28 कि. मी. अंतरावरील झमकोली, ता. भिवापुर जि नागपुर येथे दिनांक 12/12/2021 चे 17. 30 वा. दरम्यान विठठल नामदेव काळे (मृतक), वय 55 वर्षे रा. झमकोली, ता. भिवापुर जि नागपुर याने दारूच्या नशेत विषारी औषध प्राशन केले. त्यास उपचाराकामी प्रथम पि.एच.सी उमरेड व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता दि 20/12/2021 रोजी 10.45 वा. उपचारा दरम्यान त्याचा मृत्यु झाला. मेडीकल सुचनेवरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे पोलीस बुथ नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार कुणाल ठाकुर हे करीत आहे.

# गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत क्वॉटर नं. 358 हवामहल कामठी कॉलरी नं. 3 येथे दिनांक 20/12/2021 चे 14:10 वा. पुर्वी फिर्यादीचा मुलगा आशिष जोसेफ जेकब(मृतक), वय 22 वर्ष, रा. क्वॉटर नं. 358, हवामहल कामठी कॉलरी नं. 3 हा मागील फरवरी 2019 पासुन मानसिक आजाराने ग्रस्त असुन उपचार सुरू होता. त्याचे दोन भाउ व वडिल कामाला गेले असता व आई दुकानात गेली तेव्हा आशिष जेकब याने त्याचे राहते घरी कोणीही नसतांना बेडरूम मधील पंख्याचे लोखंडी कडीला कापडी दुपट्टाने बांधुन दोरीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जोसेफ हरीदास जेलब वय 57 वर्ष रा. क्वॉ नं. 358 हवामहल कामठी कॉलरी नं. 3 यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार मोहन शेळके मो.क्र. 9049136919 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर